श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## उद्धव गीता (11.7) मराठी



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्री कृष्ण तैयार।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार ।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**एकादशः स्कन्धः**

**॥ अथ सप्तमोऽध्यायः ॥**

**श्रीभगवानुवाच**

**यदात्थ मां(म्) महाभाग, तच्चिकीर्षितमेव मे ।**
**ब्रह्मा भवो लोकपालाः(स्), स्वर्वासं(म्) मेऽभिकाङ्क्षिणः ॥ 1॥**

श्रीकृष्ण म्हणाले -हे उद्धवा !तू मला जे म्हणालास ,तेच मी करू इच्छितो .ब्रह्मदेव ,शंकर ,इंद्र इत्यादी लोकपालांना सुद्धा मी त्यांच्या लोकात यावे ,असे वाटते .

**मया निष्पादितं(म्) ह्यत्र, देवकार्यमशेषतः ।**
**यदर्थमवतीर्णोऽह- मं(म्)शेन ब्रह्मणार्थितः ॥ 2॥**

पृथ्वी वर देवतांचे जे काम होते ,ते मी पूर्ण केले आहे .ब्रह्मदेवाच्या प्रार्थनेवरून याच कामासाठी मी बलरामासह अवतीर्ण झालो होतो .

कुलं(वँ) वै शापनिर्दग्धं(न्), नङ्क्ष्यत्यन्योन्यविग्रहात् ।

समुद्रः(स्) सप्तमेऽह्न्येतां(म्), पुरीं(ञ्) च प्लावयिष्यति ॥ 3॥

ब्राह्मणांच्या शापाने जणू भस्म झालेला हा यदुवंश आता आपापसात युद्ध करून नष्ट होऊन जाईल .आज पासून सातव्या दिवशी या पुरीला समुद्र बुडवून टाकेल .

यर्ह्येवायं(म्) मया त्यक्तो, लोकोऽयं(न्) नष्टमं(ङ्)गलः ।

भविष्यत्यचिरात् साधो, कलिनापि निराकृतः ॥ 4॥

प्रिय उद्धवा !ज्या क्षणी मी मृत्यू लोकाचा त्याग करीन ,त्याच क्षणी येथील सर्व मांगल्य नष्ट होईल आणि थोड्याच दिवसात पृथ्वीवर कलियुगाचा महिमा सुरू होईल .

न वस्तव्यं(न्) त्वयैवेह, मया त्यक्ते महीतले ।

जनोऽधर्मरुचिर्भद्र, भविष्यति कलौ युगे ॥ 5॥

मी या पृथ्वीचा त्याग केल्यावर तू येथे राहू नकोस .कारण बाबा रे !कलियुगामध्ये बहुतेक लोकांची रुची अधर्माकडेच राहील .

त्वं(न्) तु सर्वं(म्) परित्यज्य, स्नेहं(म्) स्वजनबन्धुषु ।

मय्यावेश्य मनः(स्) सम्यक्, समदृग् विचरस्व गाम् ॥ 6॥

तू आपले आप्त ,स्वजन आणि भाऊबंदांचा स्नेहबंध सोडून दे आणि अनन्य प्रेमाने माझ्या ठायी आपले मन लावून समदृष्टीने पृथ्वीवर विहार कर .

यदिदं(म्) मनसा वाचा, चक्षुर्भ्यां(म्) श्रवणादिभिः ।

नश्वरं(ङ्) गृह्यमाणं(ञ्) च, विद्धि मायामनोमयम् ॥ 7॥

या जगात मन ,वाणी ,डोळे ,कान इत्यादी इंद्रियांनी जे अनुभवले जाते ,ते सर्व नाशवान आहे .मनाचा कल्पनाविलास आहे ,म्हणून मायाच आहे असे समज .

पुं(म्)सोऽयुक्तस्य नानार्थो, भ्रमः(स्) स गुणदोषभाक् ।

कर्माकर्मविकर्मेति, गुणदोषधियो भिदा ॥ 8॥

ज्या पुरुषाचे मन एकाग्र नसते ,त्याला वस्तू पुष्कळ आहेत ,असा भ्रम होतो .अनेकत्वाचा भ्रम झाल्यानेच गुणदोष दिसू लागतात .ज्याची बुद्धी गुणदोष युक्त असते त्याच्यासाठीच कर्म ,अकर्म आणि विक्रम असा भेद असतो .

तस्माद् युक्तेन्द्रियग्रामो, युक्तचित्त इदं(ञ्) जगत् ।

आत्मनीक्षस्व विततं- मात्मानं(म्) मय्यधीश्वरे ॥ 9॥

म्हणून तू अगोदर आपली सर्व इंद्रिये आणि मन ताब्यात ठेव .मग हे सगळे जग आपल्या आत्म्यामध्येच पसरलेले असून ,तो आत्मा आणि परमात्मा एकरूप आहेत 'असा अनुभव घे .

ज्ञानविज्ञानसं(यँ)युक्त, आत्मभूतः(श्) शरीरिणाम् ।

आत्मानुभवतुष्टात्मा, नान्तरायैर्विहन्यसे ॥ 10॥

त्यानंतर शब्द ज्ञान आणि अनुभव यांनी चांगल्या रीतीने संपन्न होऊन तू आपल्या आत्म्याच्या अनुभवामध्येच आनंद मग्न होशील .तसेच सर्व शरीर धारण करणाऱ्यांचा आत्मा होऊन रहाशील .असे झाल्यानंतर कोणत्याही विघ्नाने तू दुःखी होणार नाहीस .

दोषबुद्ध्योभयातीतो, निषेधान्न निवर्तते ।

गुणबुद्ध्या च विहितं(न्), न करोति यथार्भकः ॥ 11॥

जो माणूस गुणदोष बुद्धीच्या पलीकडे जातो ,तो लहान मुलाप्रमाणे सदोष म्हणून निशिद्ध कर्मे टाकून देत नाही की गुण बुद्धीने विहित कर्मे करीत नाही .

सर्वभूतसुहृच्छान्तो, ज्ञानविज्ञाननिश्चयः ।

पश्यन् मदात्मकं(वँ) विश्वं(न्), न विपद्येत वै पुनः ॥ 12॥

जाने श्रुतींच्या तात्पर्यचे यथार्थ ज्ञान प्राप्त करून त्याचा अनुभवही घेतला आहे ,तो सर्व प्राण्यांचा कारण मित्र होतो आणि त्याच्या वृत्ती नेहमीच शांत राहतात .सर्व दृश्य विश्वाला तो माझेच स्वरूप समजतो .म्हणून त्याला जन्ममृत्यू असत नाही .

श्रीशुक उवाच

इत्यादिष्टो भगवता, महाभागवतो नृप ।

उद्धवः(फ्) प्रणिपत्याह, तत्त्वजिज्ञासुरच्युतम् ॥ 13॥

श्री शुभ म्हणतात -परीक्षिता !भगवान श्रीकृष्णांनी असा उपदेश केला ,तेव्हा भगवत भक्त उद्धवाने त्यांना नमस्कार करून तत्त्वज्ञान प्राप्त करून घेण्याच्या इच्छेने विचारले .

उद्धव उवाच

योगेश योगविन्यास, योगात्मन् योगसम्भव ।

निः(श्)श्रेयसाय मे प्रोक्तस्- त्यागः(स्) सं(न्)न्यासलक्षणः ॥ 14॥

उद्धव म्हणाला -आपण योगेश्वर ,सर्व योगांचे आधार ,त्यांचे कारण आणि योग स्वरूप आहात .माझ्या परम कल्याणासाठी आपण त्या संन्यासरूप त्यागाचा मला उपदेश केला आहे .

त्यागोऽयं(न्) दुष्करो भूमन्, कामानां(वँ) विषयात्मभिः ।

सुतरां(न्) त्वयि सर्वात्मन्- नभक्तैरिति मे मतिः ॥ 15॥

परंतु हे अनंता !जे लोक विषयांतच गुरफटले गेले आहेत ,त्यांना विषय भोगांचा त्याग करणे अतिशय कठीण आहे . हे सर्व स्वरूपा !त्यात सुद्धा जे लोक आपल्याला विन्मुख आहेत ,त्यांना तर हे सर्व थैव अशक्य आहे ,असे माझे मत आहे .

सोऽहं(म्) ममाहमिति मूढमतिर्विगाढस्-

त्वन्मायया विरचितात्मनि सानुबन्धे।

तत्त्वञ्जसा निगदितं(म्) भवता यथाहं(म्),

सं(म्)साधयामि भगवन्ननुशाधि भृत्यम् ॥ 16॥

हे प्रभो !मीही आपल्या मायेने रचलेल्या देह आणि देहाची संबंधित 'मी -माझे ' या मिथ्या कल्पनेने प्रापंचिक वस्तूंमध्ये बुडून गेलो आहे .म्हणून हे भगवं न !आपण ज्या संन्यासांचा मला उपदेश केला ,त्याचे स्वरूप आपल्या या सेवकाला अशा प्रकारे समजावून सांगा की ,मी सहजपणे ते आचारू शकेन .

सत्यस्य ते स्वदृश आत्मन आत्मनोऽन्यं(वँ),

वक्तारमीश विबुधेष्वपि नानुचक्षे।

सर्वे विमोहितधियस्तव माययेमे,

ब्रह्मादयस्तनुभृतो बहिरर्थभावाः ॥ 17॥

हे प्रभो !आपण त्रिकाला बाधित सत्य स्वरूप ,स्वयंप्रकाश व सर्वांचे आत्मा आहात .हे प्रभो !आत्मतत्त्वाचा उपदेश करणारा आपल्या व्यतिरिक्त देवतांमध्ये सुद्धा मला दुसरा कोणी दिसत नाही .कारण ब्रह्मदेव इत्यादी शरीराभिमानी देव आपल्या मायेने मोहित झालेले आहेत त्यामुळेच ते बाह्य विषयांना सत्य मानतात .

तस्माद् भवन्तमनवद्यमनन्तपारं(म्),

सर्वज्ञमीश्वरमकुण्ठविकुण्ठधिष्ण्यम् ।

निर्विण्णधीरहमु ह वृजिनाभितप्तो,

नारायणं(न्) नरसखं(म्) शरणं(म्) प्रपद्ये ॥ 18॥

भगवन !आपण निर्दोष ,अनंत ,सर्वज्ञ ,नियंते शक्तिमान आणि अविनाशी अशा वैकुंठ धामाचे निवासी ,तसेच माणसाचे नित्य सखा -नारायण आहात .म्हणूनच त्रिविध तापांनी पोळल्यामुळे विरक्त होऊन मी आपल्याला शरण आलो आहे .

श्रीभगवानुवाच

प्रायेण मनुजा लोके, लोकतत्त्वविचक्षणाः।

समुद्धरन्ति ह्यात्मान- मात्मनैवाशुभाशयात् ॥19॥

श्रीकृष्ण म्हणाले -हे उद्धवा !जगामध्ये जे लोक व्यवहारात चतुर आहेत ,ते चित्तातील अशुभ वासनांपासून बहु धा स्वतःच स्वतःचा उद्धार करून घेतात .

आत्मनो गुरुरात्मैव , पुरुषस्य विशेषतः ।

यत् प्रत्यक्षानुमानाभ्यां(म्), श्रेयोऽसावनुविन्दते ॥ 20॥

सर्व प्राण्यांचा ,विशेषतः मनुष्याच्या बाबतीत आपणच आपले गुरु असतो .कारण मनुष्य प्रत्यक्ष आणि अनुमान यांच्याद्वारेच आपले कल्याण करून घेतो .

पुरुषत्वे च मां(न्) धीराः(स्), साङ्ख्ययोगविशारदाः ।

आविस्तरां(म्) प्रपश्यन्ति , सर्वशक्त्युपबृं(म्)हितम् ॥ 21॥

सांख्य योग पारंगत विद्वान या मनुष्य योनीमध्ये इंद्रिय शक्ती,मनःशक्ती इत्यादींना आश्रय भूत असणाऱ्या माझ्या -आत्मतत्त्वाचा पूर्णतः प्रकटरूपाने साक्षात्कार करून घेतात .

एकद्वित्रिचतुष्पादो, बहुपादस्तथापदः ।

बह्व्यः(स्) सन्ति पुरः(स्) सृष्टास्- तासां(म्) मे पौरुषी प्रिया ॥ 22॥

मी एक ,दोन ,तीन ,चार आणि चारा पेक्षाही अधिक पाय असलेली आणि पाय नसलेली अशी अनेक प्रकारची शरीरय निर्माण केली आहेत .त्या सर्वांमध्ये मला माणसाचेच शरीर अधिक प्रिय आहे .

अत्र मां(म्) मार्गयन्त्यद्धा, युक्ता हेतुभिरीश्वरम् ।

गृह्यमाणैर्गुणैर्लिङ्गै- रग्राह्यमनुमानतः ॥ 23॥

कारण या मनुष्य शरीरात एकाग्रचित्त मनुष्य बुद्धी इत्यादी ग्रहण केल्या जाणाऱ्या साधनांनी अनुमानाचा विषय नसू नही माझ्या -सर्व प्रवर्तक ईश्वराचा -साक्षात अनुभव घेतात .

अत्राप्युदाहरन्तीम- मितिहासं(म्) पुरातनम् ।

अवधूतस्य सं(वँ)वादं(यँ), यदोरमिततेजसः ॥ 24॥

या संबंधात महात्मे हा एक प्राचीन इतिहास सांगतात .हा इतिहास म्हणजे परम तेजस्वी अवधूत आणि राजा यदु यांच्यातील संवाद आहे .

अवधूतं(न्) द्विजं(ङ्) कं(ञ्)चिच्- चरन्तमकुतोभयम् ।

कविं(न्) निरीक्ष्य तरुणं(यँ), यदुः(फ्) पप्रच्छ धर्मवित् ॥ 25॥

धर्माचे मर्म जाणणाऱ्या यजुने एकदा एक त्रिकालदर्शी तरुण ,अवधूत ,ब्राह्मणा निर्भयपणे विहार करीत असलेले पाहून त्यांना विचारले .

यदुरुवाच

कुतो बुद्धिरियं(म्) ब्रह्मन्- नकर्तुः(स्) सुविशारदा ।

यामासाद्य भवाँल्लोकं(वँ), विद्वां(म्)श्चरति बालवत् ॥ 26॥

यदुने विचारले -ब्रह्मण !आपण काही कर्म तर करीत नाही ,तरीपण आपल्यालाही चतुर्बुद्धी कोठून प्राप्त झाली ?जिच्यामुळे आपण विद्वान असूनही लहान मुलासारखे जगामध्ये वावरत आहात .

**प्रायो धर्मार्थकामेषु, विवित्सायां(ञ्) च मानवाः ।**

**हेतुनैव समीहन्ते, आयुषो यशसः(श्) श्रियः ॥ 27॥**

साधारणतः असे दिसते की ,माणसे आयुष्य ,यश 'संपत्ती किंवा मोक्ष इत्यादींची मनात इच्छा धरूनच धर्म ,अर्थ ,काम किंवा तत्व जिज्ञासे मध्ये प्रवृत्त होतात .

**त्वं(न्) तु कल्पः(ख्) कविर्दक्षः(स्), सुभगोऽमृतभाषणः ।**

**न कर्ता नेहसे किं(ञ्)चिज्- जडोन्मत्तपिशाचवत् ॥ 28॥**

परंतु आपण कर्म करण्यासाठी समर्थ ,विद्वान ,निपुण ,सुंदर आणि अमृत मधुर बोलणारे आहात .असे असूनही आपण वेडा ,उन्मत्त किंवा पिशाच्च यांच्यासारखे राहता .काही करीत नाही की काही इच्छित नाही .

**जनेषु दह्यमानेषु, कामलोभदवाग्निना ।**

**न तप्यसेऽग्निना मुक्तो, गं(ङ्)गाम्भः(स्)स्थ इव द्विपः ॥ 29॥**

जगातील अधिकांश लोक काम आणि लोभरूप वनव्यात होरपळत असतात .परंतु आपल्याला मात्र त्या आगीची झळ लागलेली दिसत नाही .जशी गंगेमध्ये असलेल्या हत्तीला वनव्याची आच लागत नाही .

**त्वं(म्) हि नः(फ्) पृच्छतां(म्) ब्रह्मन्- नात्मन्यानन्दकारणम् ।**

**ब्रूहि स्पर्शविहीनस्य, भवतः(ख्) केवलात्मनः ॥ 30॥**

ब्रह्मण !संसारातील विषयांचा स्पर्शही नसलेले आपण केवळ एकटेच असता .तरीही आपल्याला स्वतःमध्येच आनंद कसा मिळतो ?आपण हे आम्हाला सांगावे .

**श्रीभगवानुवाच**

**यदुनैवं(म्) महाभागो, ब्रह्मण्येन सुमेधसा ।**

**पृष्टः(स्) सभाजितः(फ्) प्राह, प्रश्रयावनतं(न्) द्विजः ॥ 31॥**

श्रीकृष्ण म्हणाले -ब्राह्मण भक्त ,शुद्ध बुद्धी 'यदुने त्या श्रेष्ठ ब्राह्मणाचा सत्कार करून त्यांना हा प्रश्न विचारला आणि मोठ्या नम्रतेने मस्तक ल ववून तो त्यांच्यासमोर उभा राहिला .तेव्हा ब्राह्मण म्हणाले .

**ब्राह्मण उवाच**

**सन्ति मे गुरवो राजन्, बहवो बुद्ध्युपाश्रिताः ।**

**यतो बुद्धिमुपादाय, मुक्तोऽटामीह ताञ्छृणु ॥ 32॥**

ब्राह्मण म्हणाले -राजन !मी आपल्या बुद्धीनेच पुष्कळ गुरूंचा आश्रय घेतला आहे .त्यांच्याकडून ज्ञानग्रहण करून मी या जगात मुक्तपणे फिरत असतो .तू त्या गुरूंची नावे आणि त्यांच्यापासून घेतलेली शिकवण ऐक .

पृथिवी वायुराकाश- मापोऽग्निश्चन्द्रमा रविः ।

कपोतोऽजगरः(स्) सिन्धुः(फ्), पतं(ङ्)गो मधुकृद् गजः ॥ 33॥

मधुहा हरिणो मीनः(फ्), पिं(ङ्)गला कुररोऽर्भकः।

कुमारी शरकृत् सर्प, ऊर्णनाभिः(स्) सुपेशकृत्॥ 34॥

माझ्या गुरूंची नावे अशी आहेत -पृथ्वी ,वायु ,आकाश ,जल ,अग्नी ,चंद्र 'सूर्य ,कबूतर ,अजगर ,समुद्र ,पतंग , मधमाशी ,हत्ती ,म ध गोळा करणारा ,हरीण ,मासा ,पिंगला ,टिटवी ,बालक ,कुमारी ,बाण तयार करणारा ,साप ,कोळी (कीटक ) आणि कुंभारमाशी .

एते मे गुरवो राजं(म्)श्- चतुर्विं(म्)शतिराश्रिताः ।

शिक्षा वृत्तिभिरेतेषा- मन्वशिक्षमिहात्मनः ॥ 35॥

राजन !मी या 24 गुरूंचा आश्रय घेतला आणि हे करीत असलेल्या आचरणावरून माझ्यासाठी शिकवण घेतली .

यतो यदनुशिक्षामि, यथा वा नाहुषात्मज ।

तत्तथा पुरुषव्याघ्र, निबोध कथयामि ते ॥ 36॥

हे वीरवर ययाती नंदना !मी ज्याच्याकडून ,ज्या प्रकारे ,जे काही शिकलो आहे ,ते सर्व तुला सांगतो .ऐक .

भूतैराक्रम्यमाणोऽपि, धीरो दैववशानुगैः ।

तद् विद्वान्न चलेन्मार्गा- दन्वशिक्षं(ङ्) क्षितेर्व्रतम् ॥ 37॥

पृथ्वीपासून मी क्षमा शिकलो .पृथ्वीला लोकांनी कितीही त्रास दिला ,तरी ती तो सर्व शांतपणे सहन करते .तिच्याकडून मी क्षमा हे व्रत शिकलो .जगातील प्राणी आपापल्या प्रारब्धानुसार वागत असतात .त्यांच्यापासून त्रास झाला तरी धैर्यवान पुरुषाने त्यांची अगतिकता जाणून आपला धीर सोडू नये आणि आपल्या मार्गापासून ढळू नये .

शश्वत्परार्थसर्वेहः(फ्) परार्थैकान्तसम्भवः ।

साधुः(श्) शिक्षेत भूभृत्तो, नगशिष्यः(फ्) परात्मताम् ॥ 38॥

पृथ्वीचे स्वरूप असणारे पर्वत आणि वृक्ष यांच्या सर्व क्रिया नेहमी दुसऱ्यांच्या हितासाठीच असतात .किंबहुना दुसऱ्याचे हित करण्यासाठीच त्यांचा जन्म असतो .साधू पुरुषाने त्यांचे शिष्यत्व पत्करून त्यांच्याकडून परोपकार करण्याचे शिकावे . (पृथ्वीपासून क्षमा व परोपकार हे गुण घ्यावेत.)

प्राणवृत्त्यैव सन्तुष्येन्- मुनिर्नैवेन्द्रियप्रियैः ।

ज्ञानं(यँ) यथा न नश्येत, नावकीर्येत वाङ्मनः ॥ 39॥

प्राणवायू कोणत्याही आहाराने संतुष्ट होतो ,त्याचप्रमाणे साधकाने सुद्धा इंद्रियांना आवडणारे विषय न घेता शरीर निर्वाहासाठी आवश्यक तेवढेच घ्यावेत .थोडक्यात ,ज्यामुळे ज्ञान नष्ट होणार नाही ,मन चंचल होणार नाही आणि वाणी निरर्थक बडबड करणार नाही ,हे पाहावे .

**विषयेष्वाविशन् योगी, नानाधर्मेषु सर्वतः ।**

**गुणदोषव्यपेतात्मा, न विषज्जेत वायुवत् ॥ 40॥**

वायु अनेक गुणधर्मांच्या पदार्थांवर जातो ,पण कोठेही आसक्त होत नाही की कोणाचाही गुणदोष घेत नाही .त्याचप्रमाणे योग्याने वेगवेगळ्या गुणधर्मांच्या विषयांकडे जावे लागले ,तरी त्यामध्ये आसक्तहोऊ नये की कोणाचे गुणदोष पाहू नयेत .

**पार्थिवेष्विह देहेषु, प्रविष्टस्तद्गुणाश्रयः ।**

**गुणैर्न युज्यते योगी, गन्धैर्वायुरिवात्मदृक् ॥ 41॥**

पृथ्वीपासून उत्पन्न झालेल्या पदार्थांचा संपर्क झाला असता वायू त्यांचा वास वाहून नेत असला ,तरी तो वास स्वतःला चिकटून घेत नाही .त्याचप्रमाणे आत्मदर्शी योग्याने या पार्थिव शरीराशी संबंध असेपर्यंत त्याच्या आधी व्याधी ,तहान भूक इत्यादी सहन करावे .परंतु त्यांपासून सर्वथा अलिप्त असावे . (वायू पासून अल्पसंतुष्टता ,इतरांचे गुणदोष न पहाणे व न घेणे आणि अलिप्त असणे हे गुण घ्यावेत . )

**अन्तर्हितश्च स्थिरजं(ङ्)गमेषु,**

**ब्रह्मात्मभावेन समन्वयेन ।**

**व्याप्त्याव्यवच्छेदमसं(ङ्)गमात्मनो,**

**मुनिर्नभस्त्वं(वँ) विततस्य भावयेत् ॥ 42॥**

आकाश ज्याप्रमाणे सर्व चराचरांत आत बाहेर व्यापून असते ,तरी त्या वस्तूंपासून अलिप्त असते .त्याचप्रमाणे साधकाने ,आपण ब्रह्म स्वरूप आणि सर्वत्र अधिष्ठान रूपात व्यापून असलो ,तरी सर्वांपासून अलिप्त व अमर्याद आहोत ,ही भावना आकाशापासून शिकावी .

**तेजोऽबन्नमयैर्भावैर्- मेघाद्यैर्वायुनेरितैः ।**

**न स्पृश्यते नभस्तद्वत्, कालसृष्टैर्गुणैः(फ्) पुमान् ॥ 43॥**

तेज ,पाणी ,पृथ्वी इत्यादी पदार्थ किंवा वाऱ्याने ढकललेले ढग ,धूळ इत्यादी पदार्थ आकाशातच असतात पण त्यांचा आकाशाला स्पर्श होत नाही ,त्याचप्रमाणे काळाच्या ओघात उत्पन्न होणाऱ्या देहादी पदार्थांचा आत्म्याशी संबंध असत नाही.(आकाशापासून अलिप्तपणा,अमर्याद पणा हे गुण घ्यावेत .)

**स्वच्छः(फ्) प्रकृतितः(स्) स्निग्धो, माधुर्यस्तीर्थभूर्नृणाम् ।**

**मुनिः(फ्) पुनात्यपां(म्) मित्र- मीक्षोपस्पर्शकीर्तनैः ॥ 44॥**

जसे पाणी स्वभावत:च स्वच्छ ,स्निग्ध ,मधुर आणि पवित्र करणारे असते ,तसेच तीर्थांचे दर्शन ,स्पर्श आणि नामो च्चार यांनी सुद्धा लोक पवित्र होता त ,त्याचप्रमाणे साधक पाण्यासारखा स्वभाव त :च

शुद्ध ,प्रेमळ ,मधुराभाषी आणि लोकपावन असतो व त्याचे दर्शन ,स्पर्श आणि नामो चार यांनी लोक पवित्र होता . (पाण्यापासून शुद्धता ,पावित्र्य इत्यादी गुण घ्यावेत.)

**तेजस्वी तपसा दीप्तो, दुर्धर्षोदरभाजनः ।**

**सर्वभक्षोऽपि युक्तात्मा, नादत्ते मलमग्निवत् ॥ 45॥**

दुसऱ्या तेजाने पराभूत न होणारा ,सर्व काही पोटात ठेवणारा तेजस्वी अग्नी काहीही खाऊन सुद्धा त्यांच्या दोषांनी लिफ्ट होत नाही .त्याचप्रमाणे आत्मज्ञानाने तळपणारा तपश्चर्येने दैदिप्यमान , मन इंद्रियांकडून पराभूत न होणारा ,संग्रह न करणारा साधक सर्व विषयांचा योग्य उपभोग घेऊ नये मन आणि इंद्रिये यांना त्यांचा दोष लागू देत नाही .

**तिल चिच्छन्नः(ख्) क्वचित् स्पष्ट, उपास्यः(श्) श्रेय इच्छताम् ।**

**भुङ्क्ते सर्वत्र दातृणां(न्), दहन् प्रागुत्तराशुभम् ॥ 46॥**

अग्नी लाकडात गुप्त असतो ,पण कल्याणेच्छू याजकांसाठीयज्ञकुंडात प्रगट असतो .सर्वांकडून हर्विद्रव्यघेऊन त्यांचे भूत भविष्यातील पाप नाहीसे करतो .त्याचप्रमाणे सिद्ध पुरुष बहुधा एकांतात ,अप्रगत असतो ,पण मुमुक्षुंसाठी त्यांच्याजवळ राहतो .शिवाय सर्वत्र दात्यांनी दिलेले स्वीकारून त्यांचे पूर्वोत्तर पाप धुऊन टाकतो .

**स्वमायया सृष्टमिदं(म्), सदसल्लक्षणं(वँ) विभुः ।**

**प्रविष्ट ईयते तत्तत्- स्वरूपोऽग्निरिवैधसि ॥ 47॥**

अग्नीला विशिष्ट आकार नसतो ,पण तो लाकडाच्या आकाराप्रमाणे तसा तसा दिसतो .त्याचप्रमाणे सर्व व्यापक आत्मा सुद्धा आपल्या मायेने रचलेल्या कार्यकारण रूप जगात प्रवेश केल्यामुळे त्या त्या वस्तूंच्या नामरूपासारखा भासतो.(अग्नीपासून तेजस्विता ,अपरिग्रह ,इंद्रिय संयम ,उपास्यता ,उपाधीशी असंबंध्दता इत्यादी गुण घ्यावेत.)

**विसर्गाद्याः(श्) श्मशानान्ता, भावा देहस्य नात्मनः ।**

**कलानामिव चन्द्रस्य, कालेनाव्यक्तवर्त्मना ॥ 48॥**

ज्या काळाची गती जाणली जाऊ शकत नाही .त्या काळाच्या प्रभावाने चंद्राच्या कडा कमी जास्त होतात .तरीसुद्धा चंद्र हा चंद्रच असतो .त्याचप्रमाणे जन्मल्यापासून मरेपर्यंतच्या अवस्था शरीराच्या असतात .आत्म्याशी त्यांचा काही संबंध नसतो . (चंद्रापासून हा गुण घ्यावा .देहाच्या बदलाने आत्म्यास बदल होत नाही . )

**कालेन ह्योघवेगेन, भूतानां(म्) प्रभवाप्ययौ ।**

**नित्यावपि न दृश्येते, आत्मनोऽग्नेर्यथार्चिषाम् ॥ 49॥**

आगीची ज्वाला किंवा दिव्याची ज्योत क्षणाक्षणाला उत्पन्न आणि नष्ट होत राहते ,परंतु कळत नाही .तसेच वेगवान काळामुळे प्राण्यांच्या शरीराची क्षणाक्षणाला उत्पत्ती आणि विनाश होत असतो .परंतु तो लक्षात येत नाही . (अग्नीची ज्वाला किंवा दिव्याच्या ज्योती पासून प्रकृतीचे विनाशी त्व जाणावे .अग्नि संबंधीचा हा आणखी एक गुण . )

गुणैर्गुणानुपादत्ते, यथाकालं(वँ) विमुञ्चति ।

न तेषु युज्यते योगी, गोभिर्गा इव गोपतिः ॥ 50॥

सूर्य जसा आपल्या किरणांनी पृथ्वीवरील पाणी शोषून घेतो आणि पावसाळ्यात ते पृथ्वीला देतो ,त्याचप्रमाणे योगी पुरुष इंद्रियांच्या द्वारे विषय ग्रहण करतो आणि योग्य समई त्यांचे दान सुद्धा करून टाकतो .विषयांत तो आसक्त असत नाही .

बुध्यते स्वे न भेदेन, व्यक्तिस्थ इव तद्गतः ।

लक्ष्यते स्थूलमतिभि- रात्मा चावस्थितोऽर्कवत् ॥ 51॥

पाण्याच्या निरनिराळ्या पात्रांमध्ये प्रतिबिंबित झालेला एकच सूर्य त्यातच प्रवेश करून वेगवेगळा झाल्याचे सामान्य बुद्धीच्या माणसाला दिसते ,त्याचप्रमाणे उपाधींच्या भेदामुळे प्रत्येक व्यक्तीमध्ये एकच आत्मा वेगवेगळा आहे ,असे वाटते . (सूर्यापासून अनासक्ती व उपाधीमुळे भेद प्रतीती हे गुन्हे घ्यावेत . )

नातिस्नेहः(फ्) प्रसङ्गो वा, कर्तव्यः(ख्) क्वापि केनचित् ।

कुर्वन् विन्देत सन्तापं(ङ्), कपोत इव दीनधीः ॥ 52॥

कधीही कोणाशीही अतिशय प्रेम किंवा आसक्ती ठेवू नये . अन्यथा अशा माणसाची बुद्धी दीनवाणी होऊन त्याला कबुतराप्रमाणे अतिशय क्लेश सहन करावे लागतात .

कपोतः(ख्) कश्चनारण्ये, कृतनीडो वनस्पतौ ।

कपोत्या भार्यया सार्धं- मुवास कतिचित् समाः ॥ 53॥

एका जंगलात एक कपोत झाडावर आपले घरटे बांधून त्यात मादीसह काही वर्षे पर्यंत राहत होता .

कपोतौ स्नेहगुणित- हृदयौ गृहधर्मिणौ ।

दृष्टिं(न्) दृष्ट्यां(ङ्)गमं(ङ्)गेन, बुद्धिं(म्) बुद्ध्या बबन्धतुः ॥ 54॥

त्यांच्या मनात एकमेकांबद्दल नेहमी स्नेह वाढत होता .ते दांपत्य धर्मानुसार एकमेकांच्या दृष्टीने दृष्टीला ,अंगाने अंगाला आणि बुद्धीने बुद्धीला जखडून टाकत होते .

शय्यासनाटनस्थान- वार्ताक्रीडाशनादिकम् ।

मिथुनीभूय विस्रब्धौ, चेरतुर्वनराजिषु ॥ 55॥

त्यांचे एकमेकांवर एवढे प्रेम होते की 'ते नि :शंकपणे त्या वनराईत बरोबरीने निजत ,बसत ,हिंडत फिरत ,थांबत ,गोष्टी करत ,खेळत आणि खात पीत होते .

यं(यँ) यं(वँ) वाञ्छति सा राजं(म्)स्- तर्पयन्त्यनुकम्पिता ।

तं(न्) तं(म्) समनयत् कामं(ङ्), कृच्छ्रेणाप्यजितेन्द्रियः ॥ 56॥

हे राजन !मन ताब्यात नसलेला तो कबूतर त्या कबुतरी ला जे काही हवे असेल ,ते कितीही कष्ट पडले तरी आणून देत असे .ती सुद्धा त्याच्या कामना पूर्ण करीत असे .

कपोती प्रथमं(ङ्) गर्भं(ङ्), गृह्णती काल आगते ।

अण्डानि सुषुवे नीडे, स्वपत्युः(स्) सन्निधौ सती ॥ 57॥

वेळ येतात कबुतरी ला पहिल्यांदा गर्भ राहिला .तिने घरट्यात आपली पती जवळच अंडी घातली .

तेषु काले व्यजायन्त, रचितावयवा हरेः ।

शक्तिभिर्दुर्विभाव्याभिः(ख्), कोमलां(ङ्)गतनूरुहाः ॥ 58॥

भगवंतांच्या अचिंत्य शक्तीने योग्य वेळी ती अंडी फुटली आणि त्यातून अवयव असणारी पिल्ले बाहेर पडली .त्यांचे अंग आणि त्यावरील लव अत्यंत कोमल होती .

प्रजाः(फ्) पुपुषतुः(फ्) प्रीतौ, दम्पती पुत्रवत्सलौ ।

श्रृण्वन्तौ कूजितं(न्) तासां(न्), निर्वृतौ कलभाषितैः ॥ 59॥

पिलांवर प्रेम असणारी ती दोघे मोठ्या प्रेमाने पिल्लांचे पालन पोषण करीत आणि त्यांचे गोड 'गुटूर गू ' ऐकून आनंद मग्न होऊन जात .

तासां(म्) पतत्त्रैः(स्) सुस्पर्शैः(ख्), कूजितैर्मुग्धचेष्टितैः ।

प्रत्युद्गमैरदीनानां(म्), पितरौ मुदमापतुः ॥ 60॥

ती उत्साही पिल्ले जेव्हा आपल्या सुकुमार पंखांनी आई-वडिलांना खेटून बसत , कूजन करीत ,सुंदर खोड्या करीत आणि लुटु लुटु करीत आई-बाबांकडे चालत येत ,तेव्हा माता पित्याना आनंद होई .

स्नेहानुबद्धहृदया- वन्योन्यं(वँ) विष्णुमायया ।

विमोहितौ दीनधियौ, शिशून् पुपुषतुः(फ्) प्रजाः ॥61॥

भगवंतांच्या मायेने मोहित होऊन एकमेकांच्या स्नेह बंधनात बांधलेली ती दोघे आपल्या लहानपिल्लांच्या पालनपोषणात गुंतून गेलेली असत .

एकदा जग्मतुस्तासा-मन्नार्थं(न्) तौ कुटुम्बिनौ ।

परितः(ख्) कानने तस्मिन्- नर्थिनौ चेरतुश्चिरम् ॥ 62॥

एके दिवशी ती दोघेही पिल्लांना चारा आणण्यासाठी जंगलात गेली होती .सारा गोळा करण्यासाठी बराच वेळ ती जंगलात भटकत राहिली .

दृष्ट्वा ताँल्लुब्धकः(ख्) कश्चिद्, यदृच्छातो वनेचरः ।

जगृहे जालमातत्य, चरतः(स्) स्वालयान्तिके ॥63॥

इकडे एक पारधी सहज फिरत फिरत त्या घरट्याजवळ येऊन पोहोचला .घरट्याच्या आसपास कबुतरीची पिल्ले धुडू धुडू धावत असल्याचे पाहून ,त्याने जाळे टाकून त्यांना पकडले .

कपोतश्च कपोती च, प्रजापोषे सदोत्सुकौ ।

गतौ पोषणमादाय, स्वनीडमुपजग्मतुः ॥ 64॥

पिल्लांचे पोषण करण्यात नेहमीच तत्पर असलेले ते जोडपे चारा घेऊन आपल्या घरट्याजवळ आले .

कपोती स्वात्मजान् वीक्ष्य, बालकान् जालसं(वृँ) वृतान् ।

तानभ्यधावत् क्रोशन्ती, क्रोशतो भृशदुःखिता ॥ 65॥

कबुतरी ने पाहिले की ,तिची पिल्ले जाळ्यात अडकून ची ची करीत आहेत .त्यांना अशा स्थितीत पाहून कबुतरीला अपार दुःख झाले .ती रडत रडतच त्यांच्याजवळ धावली .

सासकृत्स्नेहगुणिता, दीनचित्ताजमायया।

स्वयं(ञ्) चाबध्यत शिचा, बद्धान् पश्यन्त्यपस्मृतिः ॥ 66॥

भगवंताच्या मायेने अत्यंत दुःखी झालेली ती उचंबळणाऱ्या स्नेह्र रज्जूने घट्ट बांधली गेली होती .आपली पिल्ले जाळ्यात अडकलेली पाहून भान हरपून ती स्वतःच जाळ्यात अडकली .

कपोतश्चात्मजान् बद्धा- नात्मनोऽप्यधिकान् प्रियान् ।

भार्यां(ञ्) चात्मसमां(न्) दीनो, विललापातिदुःखितः ॥ 67॥

कबुतराने प्राणाहूनही अधिक प्रिय असलेली आपली पिल्ले आणि प्राणप्रिय मादी सुद्धा जाळ्यात अडकलेली पाहून तो अत्यंत दुःखी होऊन शोक करू लागला .

अहो मे पश्यतापाय- मल्पपुण्यस्य दुर्मतेः ।

अतृप्तस्याकृतार्थस्य, गृहस्त्रैवर्गिको हतः ॥ 68॥

"काय मी कमनशिबी ! माझी बुद्धी चालेनाशी झालेली आहे .अरेरे !या संसारात मी अतृप्त असतानाच व सर्व गोष्टी पुऱ्या होण्याआधीच माझा धर्म ,अर्थ आणि काम यांचे मूळ असणारा हा माझा गृहस्थाश्रम नष्ट झाला .

अनुरूपानुकूला च, यस्य मे पतिदेवता ।

शून्ये गृहे मां(म्) सन्त्यज्य, पुत्रैः(स्) स्वर्याति साधुभिः ॥ 69॥

मला शोभणारी व माझे सर्व ऐकणारी माझी पतिव्रता पत्नी उजाड घरात मला एकट्याला सोडून आमच्या साध्या भोळ्या पिल्लांसह स्वर्गात निघाली .

सोऽहं(म्) शून्ये गृहे दीनो, मृतदारो मृतप्रजः ।

जिजीविषे किमर्थं(वँ) वा, विधुरो दुःखजीवितः ॥ 70॥

पिल्ले गेली .पत्नी ही गेली .आता दिनवाना विधुर झालेला मी या उजाड घरात कोणासाठी जगू ?

तां(म्)स्तथैवावृताञ्छिग्भिर्- मृत्युग्रस्तान् विचेष्टतः ।

स्वयं(ञ्) च कृपणः(श्) शिक्षु, पश्यन्नप्यबुधोऽपतत् ॥ 71॥

पिल्ले व मादी जाळ्यात अडकून तडफडत असून ती आता मरणाच्या दारात आहेत ,हे स्पष्ट दिसत असूनही बिचारा कबूतर स्वतःच जाळ्यात जाऊन पडला .

तं(ल्ँ) लब्ध्वा लुब्धकः(ख्) क्रूरः(ख्), कपोतं(ङ्) गृहमेधिनम् ।

कपोतकान् कपोतीं(ञ्) च, सिद्धार्थः(फ्) प्रययौ गृहम् ॥ 72॥

तो क्रूर पारधी ,गृहस्थाश्रमी कबूतर जोडपे आणि त्याची पिल्ले मिळाल्याने 'आपले काम झाले ' ,असे पाहून त्यांना घरी घेऊन गेला .

एवं(ङ्) कुटुम्ब्यशान्तात्मा, द्वन्द्वारामः(फ्) पतत्रिवत् ।

पुष्णन् कुटुम्बं(ङ्) कृपणः(स्), सानुबन्धोऽवसीदति ॥ 73॥

ज्या कुटुंब वत्सल माणसाला प्रपंचातील सुखदुःखातच आनंद वाटतो आणि जो आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करण्यातच आपले सत्व गमावून बसतो ,त्याला कधीच शांती मिळत नाही .त्या कबुतराप्रमाणे तो आपल्या कुटुंबीयांबरोबर नाश पावतो .

यः(फ्) प्राप्य मानुषं(ल्ँ) लोकं(म्), मुक्तिद्वारमपावृतम् ।

गृहेषु खगवत् सक्तस्- तमारूढच्युतं(व्ँ) विदुः ॥ 74॥

मुक्तीचे उघडलेले दारच असे मनुष्य शरीर मिळूनही जो कबुतराप्रमाणे आपल्या घरादारातच गुंतलेला असतो ,तो उंचीवर जाऊन खाली पडू पाहणारा म्हटला पाहिजे .त्याला " आरूढच्युत "म्हणतात . (कबुतरा पासून ,कुटुंबविषयक अत्याशक्ती सर्वनाशाला कारण होते ,हा बोध घ्यावा. )

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे सप्तमोऽध्यायः ।।

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः ॥